# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**अत्यंत तातडीचे**

क्रमांक : २७१६७ / ग-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : नोव्हेंबर, २०१८
12 NOV 2018

**:: परिपत्रक ::**

महाराष्ट्र विधानमंडळाचे **तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०१८ सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी** पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होत आहे. **त्याअनुषंगाने आगामी अधिवेशनात पुढीलप्रमाणे सुरक्षा व्यवस्थाविषयक कार्यपध्दती ठरविण्यात आली आहे.**

(१) **विधान भवनाचे आवारात कोणत्याही मान्यवरांना/अभ्यागतांना शासकीय वा अशासकीय वाहनाने प्रवेश करता येणार नाही.**

(२) **विधान भवनाच्या गेट क्रमांक-१ जवळील मोकळ्या जागेत नेमून दिलेल्या ठिकाणावरच सर्व वाहने थांबविण्यात येतील व तेथून मान्यवरांना विधान भवन परिसरात व विधान भवनाच्या मुख्य पोर्चमध्ये चालत प्रवेश करावा लागेल.**

(३) विधान भवन परिसरात सर्व मान्यवरांच्या वाहनांची मुख्य प्रवेशद्वाराजवळील मोकळ्या प्रांगणात पार्किंगची व्यवस्था (वाहनतळ व्यवस्था) खालीलप्रमाणे केलेली आहे.

**पी-१** : **मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.मुख्यमंत्री,**
- **महाराष्ट्र राज्य मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा**

**पी-२** : **मा.मंत्री, मा.राज्यमंत्री, मा.मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव, मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र**
- **विधानमंडळ, मा.पीठासीन अधिकाऱ्यांचे सचिव, मंत्रालयीन प्रधान सचिव व सचिव.**

**पी-३** : **मुख्य सुरक्षा अधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, वृत्तपत्र व दूरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी.**

**पी-४** : **महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सर्व सदस्य (युनियन बँकेसमोरील मोकळी जागा).**

(४) विधान भवनात प्रवेश करताना गेट क्रमांक-१ मधून प्रवेश करण्याची व गेट क्रमांक-२ मधून बाहेर जाण्याची व्यवस्था केली आहे. त्याठिकाणी वाहन बोलविण्याची व्यवस्था (Car Calling System) करण्यात आली आहे.

.. २/-

(५) **मा.सदस्यांनी त्यांना 'विधानमंडळ सदस्य' म्हणून दिलेला बॅज सहजरित्या दिसेल अशा ठिकाणी लावावा.**

(६) अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांनी ओळखपत्र/प्रवेशपास दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

(७) विधान भवन मुख्य प्रवेशद्वार (गेट क्रमांक-१) च्या उजव्या बाजूस तसेच, मागील प्रवेशद्वारावर वैयक्तिक सुरक्षा तपासणीसाठी एक्सरे बॅगेज तपासणी यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे. अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षा तपासणी पूर्ण झाल्यानंतर विधानभवन इमारतीत प्रवेश देण्यात येईल.

(८) मा.मुख्यमंत्री/मा.मंत्री/मा.राज्यमंत्री/मा.विधानमंडळ सदस्य तसेच, विभागाचे प्रधान सचिव, सचिव व वार्ताहर यांच्या वाहनासाठी प्रवेशपत्रिका 'ग-१' कक्षाकडून घेऊन त्या वाहनावर स्पष्ट दिसतील अशा लावण्यात याव्यात. सदर प्रवेशपत्रिका असलेल्या वाहनांनाच सुरक्षा विभागाने तपासणी केल्यानंतर विधान भवनासमोरील मोकळ्या परिसरात प्रवेश दिला जाईल.

(९) **विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वारातून फक्त खालील व्यक्तींना प्रवेश देण्यात येईल.**

- **(१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.**
- **(२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**
- **(३) दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते.**
- **(४) राज्य मंत्रीमंडळातील मा.मंत्री/राज्यमंत्री.**
- **(५) दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.**
- **(६) दैनिक वृत्तपत्रांचे व दूरचित्रवाहिन्यांचे संपादक व प्रतिनिधी.**
- **(७) विधानमंडळाचे प्रधान सचिव व इतर अधिकारी/कर्मचारी.**
- **(८) मा.पीठासीन अधिकाऱ्यांचे सचिव, मा.उप पीठासीन अधिकारी/दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते यांचे खाजगी सचिव, विशेष कार्य अधिकारी, जनसंपर्क अधिकारी व विधानमंडळाचे कर्मचारी.**
- **(९) मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, प्रत्येकी एक विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक व दोन शिपाई.**
- **(१०) मा.मुख्य सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, मंत्रालयीन विभागाचे प्रधान सचिव, सचिव, सह सचिव, उप सचिव व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख व संचालक पदाच्या दर्जाचे वरिष्ठ अधिकारी.**
- **(११) मा.पोलिस महासंचालक, मा.पोलिस आयुक्त, मुंबई व वरिष्ठ पोलिस अधिकारी.**

.. ३/-

(१०) **अन्य प्रवेशपत्रिका धारकांना विधान भवनाच्या मागील प्रवेशद्वारातूनच प्रवेश दिला जाईल.**

(११) **स्वत:चे ओळखपत्र तसेच विधानमंडळ सचिवालयाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असल्यानंतरच विधान भवनात प्रवेश मिळेल.**

(१२) **विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करण्यासाठी अभ्यगतांना ६ ते १२ महिन्यांसाठीचे प्रवेशपास वितरीत करण्यात आले आहेत. सदरचे प्रवेशपास अधिवेशन कालावधीकरीता सुरक्षेच्या कारणास्तव स्थगित करण्यात आले असून अशा पास धारकांनी सत्र कालावधीत त्या दिवसासाठी किंवा संपूर्ण सत्र कालावधीसाठी नव्याने पास घेणे आवश्यक आहे.**

(१३) मा.मंत्री महोदयांचे खाजगी सचिव, प्रत्येकी एक विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक व दोन शिपाई यांना विधानमंडळाच्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर प्रवेश मिळेल.

(१४) मा.सदस्यांच्या एका अधिकृत स्वीय सहायकास फोटो ओळखपत्राच्या अधीन राहून विधान भवनात प्रवेश देण्यात येईल.

(१५) **मा.मंत्री महोदयांच्या/मा.सदस्यांच्या अंगरक्षकांना तसेच, वाहनचालकांना विधान भवनात प्रवेश करता येणार नाही. त्यांच्यासाठी युनियन बँकेसमोरील मोकळया जागेत उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये त्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.**

(१६) अधिवेशन कालावधीत मा.मंत्रीमहोदयांना भेटण्यासाठी येणाऱ्या **शिष्टमंडळांना कोणत्याही परिस्थितीत विधानभवनामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही.** अति आवश्यक शिष्टमंडळांच्या सदस्यांसाठी विधान भवनाच्या बाहेरील परिसरात युनियन बँकेसमोरील मोकळ्या जागेत मंडपामध्ये व्यवस्था केलेली आहे. मा.मंत्री महोदयांना त्याठिकाणी शिष्टमंडळाला भेटता येईल.

(१७) **अधिवेशन कालावधीत मा.मंत्री महोदयांनी कोणत्याही प्रकारच्या शिष्टमंडळांना भेटीसाठी विधान भवनातील त्यांच्या दालनात न बोलविता मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात भेट घ्यावी.**

(१८) **अधिवेशन कालावधीत मा.मंत्रीमहोदयांनी विभागीय अधिकाऱ्यांना त्यांच्याकडून माहिती अवगत करून घेण्यासाठी (ब्रिफिंगसाठी) विधान भवनातील त्यांच्या दालनात न बोलविता मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात बोलवावेत.**

(१९) वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना त्यांच्या वृत्तसंस्थेने दिलेले ओळखपत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दिलेले अधिस्वीकृतीधारक ओळखपत्र (Press Accreditation Card) तसेच, या सचिवालयाने दिलेल्या प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असल्यानंतर विधान भवनात प्रवेश मिळेल.

(२०) खाजगी दूरचित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींना त्यांच्या दूरचित्रवाहिन्यांनी दिलेले ओळखपत्र तसेच, या सचिवालयाने दिलेल्या प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असल्यानंतर विधान भवनात प्रवेश मिळेल.

.. ४/-